सकाळ १८।०४।२०१८ पान नं. ५

# बँकांची स्थिती चांगली : विश्वनाथन

पुणे, ता. १८ : देशातील बँकांमध्ये थकीत कर्जांची संख्या आणि रक्कम मोठी आहे. तुलनेत कर्ज वसुली चांगल्या प्रमाणात होत असल्यामुळे बँकांची स्थिती चांगली असल्याचे मत भारतीय रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर एन. एस. विश्वनाथन यांनी बुधवारी व्यक्त केले.

कोंढवा येथील राष्ट्रीय बँक व्यवस्थापन संस्थेच्या (नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ बँक मॅनेजमेंट - एनआयबीएम) १४ व्या पदवीप्रदान सोहळ्यात ते बोलत होते. या वेळी 'एक्सलन्स एनेब्लर्स'चे अध्यक्ष एम. दामोदरन, एनआयबीएमचे संचालक डॉ. के. एल. धिंग्रा यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी ८७ स्नातकांना बँक व्यवस्थापन विषयातील पदव्युत्तर पदवी, सुवर्णपदक प्रदान करण्यात आले.

**“ बुडीत कर्जांची संख्या वाढत असल्यामुळे बँकांची स्थिती खालावत असल्याची भीती व्यक्त होत आहे; परंतु कर्जदारांसोबत तडजोड करून काही रक्कम वसुली केली जात आहे. त्यामुळे स्थिती सुधारत आहे.**
**- एन. एस. विश्वनाथन,**
डेप्युटी गव्हर्नर

एम. दामोदरन म्हणाले, “वित्तीय सेवांमध्ये बँकांमधील मनुष्यबळाला व्यवस्थापन, प्रशिक्षणाची आवश्यकता आहे.”